I.O.

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र　जिल्हा District: मुंबई　पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि　पहिली खबर क्र. FIR No.: 17　वर्ष Year: 2025　दिनांक Date: 30/04/25

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988　कलमे Sections: 7, 12.
   (ii) अधिनियम Act ..........　कलमे Sections ..........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ..........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: 21/04/25　तारीख पासून Date from: 11:00　वेळ Time: 29/04/25　तारीख पर्यंत Date to: 04:15　वेळ Time

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००　(2) ०३.०० ते ०६.००　(3) ०६.०० ते ०९.००　(4) ०९.०० ते १२.००　(5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.००　(7) १८.०० ते २१.००　(8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.　तारीख Date: 21/04/2025　वेळ Time: 11:00

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 02　तारीख Date: 30/04/2025　वेळ Time: 5:15

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी　लेखी / तोंडी Written / Oral ..........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ..........　चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ..........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: आचार्य लाड मंडई, रेचवर्ड, मनपा कार्यालय पहिला माळा, खार (प), मुंबई　ठिकाणीचे नंबर No. if any　गल्ली Ward　रस्त्याचे नाव Name of road ..........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..........　गाव Village　पोस्ट Post　तालुका Taluka　जिल्हा Dist. ..........　राज्य State ..........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असलयास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........　तालुका Taluka ..........　जिल्हा Dist. ..........　राज्य State ..........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: हरि प्रकाश रामगणेश दुबे　(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: रामगणेश दुबे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 65 वर्ष　(d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय　फोन Phone No.: 9967478848

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........　दिल्याचा दिनांक Date of issue ..........　दिल्याचे ठिकाण Place of Issue ..........　(f) व्यवसाय Occupation ..........

(g) धर्म Religion: हिंदू　जात Caste ..........　जनजात Sub-Caste ..........

(h) पत्ता Address: बिल्डींग नं. 04/302, म्हाडा ओशिवरा, मनमोहन को.ऑ. सोसायटी　चाळी/सर्वे नं. Ward　घर/नाव नं. House Name No.　फोन/मो. नं. Phone No.　पॅन नं. Pan No.　वोटर नं. Card No.

रस्त्याचे नाव Road: न्यु लिंक रोड　जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: अंधेरी (प)　गाव Village: मुंबई-400053　पोस्ट Post ..........　पो. स्टे. P. Stn. ..........

तालुका Taluka ..........　जिल्हा Dist. ..........　राज्य State ..........　सध्याचा पत्ता Present Address ..........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरेला द सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

① संजय वसंत घोलप, वय 56 वर्षे, मुख्य निरीक्षक (प्रभारी सहा. अभियंता), म. ज्योतिबा फुले मंडई, सी.पी. ऑफीस समोर
② तुषारचंद्र मधुकर कडू, वय 52 वर्षे, शिपाई, म. ज्योतिबा फुले मंडई, सी.पी. ऑफीस समोर, मुंबई
③ सचिन रामदास कोळविलकर, वय 49 वर्षे, शिपाई, म. ज्योतिबा फुले मंडई, सी.पी. ऑफीस समोर, मुंबई

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

ASST. COMMIS... ANTI-CORR...
Scanned with OKEN Scanner

फिर्यादी श्री. प्रकाश रामगणेश दुबे, वय 65 वर्षे, धंदा - पुजापाठ रा. सी. बिल्डींग नं. 04/302 म्हाडा ओशिवरा सनशाईन को. हौ. सोसायटी न्यु लिंक रोड, अंधेरी (प) मुंबई-400053 यांचा स्वतंत्र पानावर नोंद केलेली फिर्याद हीच सदर गुन्हयाची प्रथम खबर अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(शैलजा शिंदे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
वरळी, मुंबई.

जबाब

दिनांक ३०/०४/२०२५

श्री.श्रीप्रकाश रामगणेश दुबे,वय ६५ वर्षे, धंदा- पूजापाठ (भटजी) रा.ठि रूम नं ३०२, तिसरा माळा , बिल्डीग नं ०४ ,ओशीवरा शनशाईन को.हौ.सोमायटी न्यु लिंक रोड अंधेरी, (प) मुंबई.५३ मो.९९६७४७८८४८

------------

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्त्यावर सुमारे २१ वर्षापासून पत्नी नामे श्रीमती. सरिता श्रीप्रकाश दुबे व मुलासह राहवयास असून माझे मुलाचे नांव श्रेयस श्रीप्रकाश दुबे आहे.मी पूजापाठ (भटजी) करून त्यातून मिळणा-या पैशातून माझा व माझे कुटुंबाचा उदनिर्वाह करतो.

दिनांक ०७/०४/२०२२ रोंजी रोड कटिंग मध्ये महानगरपालिकेने पी.ए.पी महानगरपालिका मंडई, बेहराम बाग रोड, जोगेश्वरी येथे २२५ चौ.फुट गाळा दिला आहे. माझे गाळयाच्या समोर बीएमसीची मोकळी जागा असून सदर जागेवर मी दिनांक ०७/०८/२०२३ रोजी पासून लहान मुलाना योगा शिकवण्याचे काम करतो. बीएमसीच्या मोकळया जागेवर मी योगा शिकवितो म्हणून दिनांक ०१/१०/२०२४ रोजी बृहन्मुंबई महानगरपलिका (बाजार विभाग) बेहराम बाग रोड पी.ए.पी महानगरपालिका मंडई यांच्या कार्यालयातून मला पहिली नोटीस प्राप्त झाली व दिनांक १९/१०/२०२४ रोजी दुसरी नोटीस प्राप्त झाली आहे. मला बीएमसी अधिकारी श्री. संजय घोलप यांनी त्यांचे ऑफिस बेहराम बाग रोड, पी.ए.पी महानगरपालिका मंडई येथे बोलावून सांगितले की, जर तुम्हाला तिसरी नोटीस नको असेल तर मला प्रत्येक महिण्याला रू १००००/-इतकी रक्कम दयावी लागेल. मला संजय घोलप यास पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २१/०४/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे संजय घोलप यांचेविरुध्द लेखी तक्रार दिली आहे.

माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याकरीता लाप्रवि, मुंबई विभागाचे पोलीस निरीक्षक शैलजा शिंदे व सपोआ शिरीष माणगांवे यांची नेमणुक करण्यात आली. त्यानंतर पोनि शिंदे यांनी मला माझे तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून त्याकरीता करण्यात येणाऱ्या कारवाईची माहिती दिली व समजावून सांगितले. त्यानंतर पो.नि शिंदे यांनी माझी दोन शासकिय पंच सोबत ओळख करून दिली.पो.नि शिंदे यांनी मला सांगितले की, लोकसेवक हे कार्यालयात उपस्थित आहे किवा कसे याबाबत खात्री करण्याकरिता लोकसेवक यांना मोबईल फोन दवारे कॉल करण्यात येणार आहे. त्यानंतर पो.नि शिंदे, सपोआ मानगांवे , दोन शासकिय पंच व मी असे ॲन्टी करप्शन ब्युरोच्या येथील रूम नं १०२ मध्ये गेलो. माझा मोबईल क्र ९९६७४७८८४८ वरून लोकसेवक संजय घोलप यांचा मोबाईल क्र ९५९४२८८८४९ केला असता लोकसेवक यांनी फोन उचला नाही. त्यांनतर थोडया वेळा नंतर पुन्हा फोन केला असता त्यांनी माझा फोन उचलला नाही. मी तिस-यादा फोन करून माझा फोन चा स्पिकर ऑन केला असता त्यांनी माझा फोन उचलला तेव्हा त्यांनी दिनांक २२/०४/२०२५ रोजी खार मार्केट येथे दु. ०१.०० वा भेटण्यास बोलविले.

मी दिनांक २२/०४/२०२५ रोजी सकाळी ११.३० ॲन्टी करप्शन ब्युरो येथे आलो. त्यानंतर पो.नि शिंदे, सपोआ माणगांवे , दोन शासकिय पंच व मी असे ॲन्टी करप्शन ब्युरो येथील रूम नं १०२ मध्ये गेलो तेथे डिजीटल व्हाईस रेकॉडरवर माझे वक्तव्य घेण्यात आले. त्यांनतर पो.नि शिंदे यांनी पडताळणी पथका बरोबर माझी ओळख करून दिली. त्यांनतर आम्ही लोकसेवक यांना भेटण्यास रवाना झालो. घनकचरा व्यवस्थापन वसाहत हसनाबाद लेन खार (प) येथे आल्यानंतर माझे मोबईल फोन वरून लोकसेवक यांच्या मोबाईलवर फोन केला असता लोकसेवक यांनी फोन उचलला नाही. त्यांनतर थोडया वेळाने पुन्हा फोन केला असता त्यांनी माझा फोन उचलला नाही. लोकसेवक यांच्याशी भेट न झाल्याने आम्ही ब्युरो कार्यालयात परत आलो.

मला लोकसेवक घोलप यांनी दिनांक २३/०४/२०२५ रोजी माझे मोबाईल फोनच्या व्हॉटस ॲप वर मेसेज करून गुरूवार दिनांक २४/०४/२०२५ रोजी खार येथे भेटण्यास बोलविले. मला गुरूवारची पुजा असल्याने मी त्यांना गुरूवारी भेटू शकणार नसून सोमवारी दिनांक २८/०४/२०२५ रोजी खार येथे दुपारी ०१.०० भेटणार असल्याचे व्हॉटस ॲप मेसेज दवारे कळविले त्यांवर त्यांनी होकार दर्शविला. मी पो.नि शिंदे यांना फोन करून सदरची माहिती दिली.

मी दिनांक २८/०४/२०२५ रोजी सकाळी ११.२० वा ॲन्टी करप्शन ब्युरो येथे आलो. त्यानंतर पो.नि शिंदे, सपोआ माणगांवे, दोन शासकिय पंच व मी असे ॲन्टी करप्शन ब्युरोच्या येथील रूम नं १०२ मध्ये गेलो तेथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर माझे वक्तव्य घेण्यात आले. त्यांनतर आम्ही लोकसेवक यांना भेटण्यास रवाना होवून खार रेल्वे पोलीस वसाहत येथे पोहचलो. पो.नि शिंदे यांच्या सुचने नुसार मी लोकसेवक यांना फोन करून माझा फोन चा स्पिकर ऑन केला असता त्यांनी माझा फोन उचलला तेव्हा त्यांची तब्वेत ठिक नसल्याचे सांगुन दिनांक २९/०४/२०२५ रोजी खार मार्केट येथे दु. ०१.०० वा भेटण्यास बोलविले.

Scanned with OKEN Scanner

दिनांक २९/०४/२०२५ रोजी मी सकाळी ०९.१९ वा लोकसेवक घोलप यांना मोबाईलवर कॉल केला असता त्यांनी कॉल उचलला नाही. लगेच ०९.२० वा लोकसेवक घोलप यांचा कॉल आला व त्यांनी मला खार मार्केट येथे भेटण्यास बोलविले. त्यानंतर मी व माझा मुलगा श्रेयस दुबे सकाळी १०.०० वा अँन्टी करप्शन ब्युरो येथे आलो. त्यानंतर पो.नि शिंदे, मपोआ साणगांवे, दोन शासकिय पंच व मी असे अँन्टी करप्शन ब्युरोच्या येथील रुम नं १०२ मध्ये गेलो तेथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर माझे वक्तव्य घेण्यात आले. त्यानंतर आम्ही लोकसेवक यांना भेटण्यास रवाना होवून खार रेल्वे पोलीस वसाहत येथे पोहचलो. दुपारी १२.३२ वा लोकसेवक घोलप यांचा माझे मोबाईलवर कॉल आला व त्यांनी मला खार मार्केट येथे भेटण्यास बोलविले. सदरचा कॉल डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्यात आला आहे. लोकसेवक घोलप हे आज लाचेची मागणी करून मला त्यांचे सोबत थांबवून माझा मुलगा श्रेयस यास लाचेची रक्कम आणण्यास सांगण्याची शक्यता असल्याने मी पो.नि शिंदे यांना सांगितले की, डिजीटल व्हाईस रेकॉर्डर श्रेयस यांस लावण्यात यावा.

त्यानंतर पोनि शिंदे यानी त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करून पोह गायकवाड यानी श्रेयसच्या शर्टाच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी, श्रेयस व पंच मिसाळ असे लोकसेवक यांनी सांगितलेल्या खार मार्केट मधील श्रीकृष्ण छाया हॉटेल खार (प) येथे लोकसेवकाची भेट घेणेकरीता गेलो. परंतू नमूद ठिकाणी लोकसेवक घोलप हे मिळून आले नाहीत. म्हणून मी लोकसेवक घोलप यांना कॉल केला असता त्यांनी कॉल उचलला नाही. त्यानंतर लगेच लोकसेवक घोलप यांचा माझे मोबाईलवर कॉल आला व त्यांना चक्कर येत असल्याचे सांगून त्यांच्या खार मार्केट येथील पहिल्या मजल्यावरिल कार्यालयात बोलविले. मी, श्रेयस व पंच मिसाळ लोकसेवक घोलप यांच्या कार्यालयात पोहचलो तेथे त्यांच्याशी आमची भेट झाली. आम्ही कामाच्या बाबत चर्चा केली असता लोकसेवक घोलप यांनी माझेकडे रू. १००००/- रकमेची लाचेची मागणी करून श्रेयस यांच्याकडे खाकी रिकामा लिफाफा देवून त्याच्यात लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. मी व लोकसेवक घोलप हे श्रेयसची वाट पाहत त्यांच्या कार्यालयात बसून होतो. थोडयावेळाने लोकसेवक घोलप यांनी मला सांगितले की, श्रेयसला कॉल करून लवकर लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगा. म्हणून मी श्रेयसला मोबाईलवर कॉल करून कुठे आहेस असे विचारले असता, त्याने सांगितले की रस्त्यात आहे येत आहे.

त्यानंतर थोडयावेळाने श्रेयस व पंच श्री. पाडावे हे लोकसेवक याच्या कार्यालयात आले. श्रेयस याने पंच पाडावे यांची ओळख माझ्याशी त्याचा मित्र म्हणून करून दिली व त्यांच्याकडून लाचेच्या रक्कमेचे पैसे घेतल्याचे सांगितले. श्रेयस याने लाचेच्या रक्कमेचा खाकी लिफाफा माझेकडे दिला. मी तो लिफाफा लोकसेवक घोलप यांच्याकडे दिला त्यावेळी लोकसेवक घोलप यांनी आवाज देवून एका इसमास बोलाविले व त्यांच्याकडे लिफाफा देवून सदरचा लिफाफा 'सचिनला दे' असे सांगितले. त्या इसमाने सदरचा लिफाफा बाजूला असलेल्या एका इसमास दिला. त्यानंतर दबा धरून बसलेल्या पथकामधील अंमलदारांनी लोकसेवक संजय घोलप, तुळशीदास कडू व सचिन कोडंविलकर यांना लाचेच्या रक्कमे सोबत ताब्यात घेतले.

तरी लोकसेवक संजय वसंत घोलप, ५६ वर्षे, धंदा- नोकरी, पद-मुख्य निरीक्षक (प्रभारी महा अधिक्षक, बाजार )- बृहन्मुंबई महानगर पालीका, क्रार्फट मार्केट, मुंबई यांनी त्यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे वापर करून, स्वतःच्या गैरफायदयाकरीता मी बीएमसीच्या मोकळया जागेवर योगा शिकवितो म्हणून मला दिलेल्या कायदेशीर नोटीशीवर कारवाई न करण्याकरिता माझेकडे आज रोजी रू. १००००/- लाचेच्या रकमेची मागणी करून माझेकडून रू. १००००/- रक्कम स्विकारताना त्यांना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले. त्यांचेसोबत लोकसेवक तुळशीदास मधुकर कडू, वय ५२ वर्षे (शिपाई , बाजार )- आचार्य लाड मंडई, एच वार्ड, महानगर पालिका कार्यालय, खार पश्चिम मुंबई) व सचिन रामदास कोडविलकर वय ४९ वर्षे (शिपाई , बाजार )- आचार्य लाड मंडई, एच वार्ड, महानगर पालिका कार्यालय, खार पश्चिम मुंबई) यांनी लोकसेवक संजय घोलप यांच्या मागण्यावरून लाचेची रक्कम रू. १०,०००/- स्विकारली व सदर कृत्यास प्रोत्साहन दिले. म्हणून माझी त्यांचेविरोधात तक्रार आहे.

माझा जबाब मराठित संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मला मराठित वाचून हिंदीतून समजावून सांगितला, तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(शैलजा शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........ —

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ —

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील फिर्यादी हे मनपाच्या दोन दुकान गाळ्याच्या मधल्या मोकळ्या जागेवर योगा शिकवितात म्हणून त्यांना बेकायदेशीर नोटीस देण्यात आली. सदर कायदेशीर नोटीसीवर कारवाई न करण्याकरीता आलोसे क्र 01 यांनी यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे स्वतःच्या फायद्याकरीता फिर्यादीकडे रु 10,000/- लाचेची मागणी करून त्यांनी फिर्यादीकडून रु 10,000/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. आलोसे क्र 01 यांनी आलोसे क्र 02 यांचेकडे लाचेची रक्कम ही आलोसे क्र 03 यांना देण्याकरीता सांगितले त्याप्रमाणे आलोसे क्र 02 व आलोसे क्र 03 यांना लाच स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा नोंद करण्यात येत आहे.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........

(3) Transferred to P. S. ........
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली. [signature]

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा [signature]

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही [signature] (शिंदे)

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name शैलजा शशिकांत शिंदे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई.

Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 30/04/2025

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner